**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र. १८**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार,दिनांक १०/१/२०१८ रोजी दुपारी ३=३० (साडे तीन ) वा. म.ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. १५८**

**मा .सौ.सुजाता शेट्टी व मा. योगेश समेळ यांचे दि. २.१.२०१८ चे पत्र.**

प्रभाग क्र.१६ क मधील डॉ.शामराव कलमाडी शाळा इयत्ता ८ वी ते इयत्ता १२ पर्यंत सुरु करणे .

**विषय क्र. १५९**

**मा .सौ.विजयालक्ष्मी हरिहर यांचे दि.२.१.२०१८ चे पत्र.**

प्रभाग क्र.१८ ,गंजपेठ एम.एस.ई.बी. ऑफिस शेजारील मुतारी नादुरुस्त असून सदर मुतारीचा वापर आसपासचे व या रस्त्यावरुन येणारे जाणारे नागरिक करीत नाहीत .तसेच या मुतारीच्या शेजारीच ६४ सिट्स सुलभ शौचालय बांधलेले आहे .

तरी एम.एस.ई.बी. ऑफिस शेजारील मुतारी पाडून त्याठिक़ाणी आरोग्य कोठी बांधण्यात यावी .

**विषय क्र. १६०**

**मा .सौ. रेश्मा अनिल भोसले यांचे दि. ४ .१.२०१८ चे पत्र.**

प्रभाग क्र.७ड मधील मुळारोड ,न.ता.वाडी व अशोकनगर येथे सार्वजनिक स्वच्छतागृहे आहेत. सदरर ठिकाणच्या स्वच्छतागृहांची अवस्था दयनीय झालेली आहे. सदर स्वच्छतागृहांमुळे परिसरामध्ये दुर्गंधी पसरल्याने तेथील नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला आहे. त्यामुळे त्यांचा वापर नागरिकांकडून फारसा होत नाही. तेथील नागरिकांच्या मागणीनुसारी सदर ठिकाणची जुनी स्वच्छतागृहे पाडून त्याच ठिक़ाणी नवीन अत्याधुनिक सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणेसाठी पुणे मनपाच्या २०१७ –१८ च्या अंदाजपत्रकामध्ये निधी उपलब्ध करुन घेतलेला आहे.

तरी कृपया सदर ठिकाणची जुनी स्वच्छतागृहे पाडून त्याच ठिक़ाणी नवीन अत्याधुनिक सार्वजनकि स्वच्छतागृहे बांधणेसाठी आपणाकडून मंजूरी मिळावी .

## खात्याकडील प्रस्ताव

**विषय क्र. १६१**

राणी लक्ष्मीबाई सक्षमीकरण योजना अंतर्गत विविध योजना/कार्यक्रम/उपक्रम राबविणे बाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि /७४८,दि.४.१.२०१८ चे पत्र .

<u>विषय क्र. १६२</u>

ज्वेलरी डिझायनिंग प्रशिक्षणासाठी खरेदी केलेल्या मशिनरी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाकडील ज्वेलरी डिझाईन प्रशिक्षण केंद्रासाठी उपलब्ध करुन देणेबाबत मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि /७६४,दि.६.१.२०१८ चे पत्र .

## <u>मागील सभेचे विषय</u>

<u>विषय क्र. १६३</u>

नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेतंर्गत सन २०१६–१७ मधील र.रु.५० लाख पर्यंतची कामे करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचेकडील जा.क्र.मआ /समाज कल्याण/ ६०२, दिनांक . ७.१२.२०१७ चे पत्र.

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३.१.२०१८ च्या सभेत ठरले होते. )**

<u>विषय क्र. १६४</u>

पुणे महानगरपालिके मार्फत पुणे शहरातून त्या त्या आर्थिक वर्षात परदेशात उच्च शिक्षण (पदवी नंतरच्या वैद्यकीय / अभियांत्रिकी /संगणकीय / व्यवस्थापन / विधी / वाणिज्य इ.) घेण्यासाठी जाणाऱ्या मागासवर्गीय एकूण ५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी र.रु.२ लाख एकदाच अर्थसहाय्य देणेबाबत मा.पक्षनेते सभा विषय क्र.३६, दिनांक ६/६/२०१६ तसेच नसजा क्र.१४५५, दि.८/६/२०१६ रोजीच्या पत्राला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा. क्र. मआ/सविवि/५३२,दि. १६.११.२०१७ अन्वये पाठविलेला अभिप्राय विचारासाठी .

**( सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.३.१.२०१८ च्या सभेत ठरले होते. )**

नगरसचिव
पुणे महानगरपालिका